



॥ श्री ॥

# अद्वैत मकरंद

## निवेदन

फारसे ज्ञात नसलेले श्रीलक्ष्मीधर कवी ह्यांची ही रचना आहे. श्रीस्वयंप्रकाशयती हे ह्या रचनेचे आद्य टीकाकार आहेत. आद्य टीकाकारांचे पुढील अभ्यासकांवर नेहमीच ऋण असते. त्यामुळे श्रीस्वयंप्रकाशयतींनी केलेले मंगल तसेच ठेवले आहे. पुढे जेथे त्यांना अनुसरले तेथे त्यांचा उल्लेख केला आहे. ही रचना मुमुक्षूला अतिशय अनुकूल आहे. शास्त्र, नित्य जीवनातील अनुभव व तर्क यांचा उपयोग करून तीव्र मुमुक्षू तत्वारूढ होईल एवढे सामर्थ्य या रचनेत आहे. मूळ श्लोकांचे थोडे स्पष्टीकरण व थोडा सरलार्थ असे मिश्रण असलेल्या काही ओव्यांची रचना केली आहे. टीका करताना ओव्यांचा सरलार्थ दिलेला नाही. तो टीकेत समाविष्ट आहे. जेथे गूढ वेदान्ताचा संबंध आला आहे तेथे टीकेत काहीशी दुर्बोधता अपरिहार्यपणे आली आहे. पण अशी स्थळे क्वचित आहेत. व्यावहारिक जबाबदाऱ्या असणाऱ्या मुमुक्षूंना उपयोग व्हावा ही दृष्टी स्पष्टीकरण करताना ठेवली आहे. परंतु त्यांनाही वेदान्तशास्त्राचे काही संस्कार असल्याशिवाय यथार्थ आकलन होणे कठीण जाईल.

डॉ. श्री. द. देशमुख

काही श्लोक व त्यावरील ओव्या यांचे विवरण -

कटाक्षकिरणाचान्तन्महामोहाब्धये नमः । अनन्तानंदकृष्णाय जगन्मङ्गलमूर्तये ॥१॥
(नमन)ज्याच्या कृपाकटाक्षरुप किरणांनी भक्तांचा मोहसमुद्र आटून जातो, जो अनंत, आनंदरूप व जगाकरीता मांगल्याची प्रत्यक्ष मूर्ती आहे अशा श्रीकृष्णाला मी वंदन करतो.

कृपाकटाक्षाचिये किरणें । मोहसमुद्राचे आटणें । घडे जये त्या श्रीकृष्णें । वंदू तयांते ॥१॥
तया आदि ना अंत । मांगल्यची मूर्तिमंत । आनंद कदा ना खन्त । जगता लागी ॥२॥

जीवाला झालेला अनादी मोह नाहीसा करणे हा या रचनेचा हेतू आहे. हा मोह व्यापक व दुस्तर असल्याने त्याला समुद्राचा दृष्टांत दिलेला आहे. त्याचबरोबर समुद्र खारट असल्याने तो दुःखरूप असल्याचे सुचविले आहे. हा समुद्र पार करण्याऐवजी तो आटवून टाकावा ही कल्पना प्रामुख्याने येथे मांडली आहे. तो आटवण्यासाठी प्रखर उष्णतेची गरज आहे. ती उष्णता श्रीगुरुंच्या कृपाकटाक्षरूप किरणांमध्ये असते. श्रीगुरू हे श्रीकृष्णाचेच लौकिक रूप असल्याने त्याला वंदन करून त्याची स्तुतीही केली. तो अनन्त, आनंदरूप व मंगल असल्याचे सांगितले.

मोह हा शब्द व्यवहारात "अनावर आकर्षण" अशा अर्थाने सर्वसाधारणपणे वापरला जातो. परमार्थात मोह शब्दाचा "भ्रम" असा अर्थ आहे. अर्थात भ्रमाचा परिणाम म्हणून असे "अनावर आकर्षण" होऊ शकते. सत्ता, संपत्ती, स्त्री, किर्ती इत्यादिकांचे अनावर आकर्षण हे व्यावहारिक मोहाचे स्वरूप असून देहतादात्म्य, जगत्सत्यत्व, अहंममत्व, कर्तृत्व भोक्तृत्व हे पारमार्थिक मोहाचे स्वरुप आहे. देहतादात्म्यामुळें सुखासाठी सत्ता इत्यादींचे अनावर आकर्षण निर्माण होते. गीतेत अर्जुनानेही शेवटी "नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा ।" अशी स्वतःची अवस्था सांगितली. अर्जुनाला झालेला विषाद हा त्याला झालेल्या मोहाचा परिणाम होता. "अथ मोहो .... स्यादविद्यायां मूर्च्छने" "अविद्येमुळे आलेली झापड" असा मोह या शब्दाचा अर्थ मेदिनीत दिला आहे. देहतादात्म्यादी मोहाचे अविद्या हेच मूळ कारण ठरते. ही अविद्या अनादी असल्याने तिचे मूळ शोधण्याच्या प्रयत्नात वेळ, शक्ती व बुद्धी जराही खर्च न करता अविद्या निवृत्तीसाठी झटावे. "अनाद्यविद्यानिर्वाच्यां कारणोपाधिरुच्यते ।" (आचार्य) "अनादिरविवेकोऽयं मूलाविद्येति गम्यताम्" (पंचदशी ६-२५).

"प्रत्येक गोष्टीची कोठेतरी, कधीतरी, कोणीतरी सुरुवात केली असली पाहिजे" हा व्यावहारिक नियम परमार्थात कामाला येत नाही. अविद्या केवळ कल्पना असल्याने, कल्पनेची सुरुवात, तीच तिची सुरूवात व कल्पनेचा अंत हाच तिचा अंत. कल्पित जीव, कल्पित अविद्येची कल्पना करतो ! "ब्रह्म आहे" असे म्हणणारासुद्धा "माया आहे" असे म्हणण्याप्रमाणेच चूक करीत असतो!! फक्त दोन्ही चुकांमध्ये फार फार अंतर आहे.

तेचि कल्पना सांडूनि पाहीं । तरि मी भूतीं भूतें माझिया ठायीं। हें स्वप्नींहीं परि नाही । कल्पावया जोगें ॥ ज्ञाने. ९-८२॥

मायेची किंवा अविद्येची स्वप्नातही कल्पना करता येणार नाही व आत्मस्वरूपाचा गाढ झोपेतही निरास होणे शक्य नाही. "ब्रह्म आहे" असे म्हणणारा ब्रह्माहून वेगळा पडतो. अद्वैतरूप ब्रह्मस्वरूपात वेगळे पडण्यासारखे काहीच नाही. जे वेगळे पडल्यासारखे वाटते तो कल्पनेचा खेळ आहे.

उष्णतेने पाणी आटते हे प्रसिद्ध आहे. तसा मोहसागर आटण्यासाठी उष्णतेची जरूरी आहे. ही उष्णता अर्थातच मोहाचे कारण नष्ट करणाऱ्या गुरूवाक्याची असते. पाणी आटले की पाण्याचा खारटपणा म्हणजे दुःख नाहीसे होते. प्रपंचसागराच्या पाण्याचा खारटपणा नाहीसा करणे कधीच शक्य नाही. खारटपणा हे जसे समुद्राच्या पाण्याचे स्वरूप आहे तसे दुःख हे प्रपंचाचे स्वरूप आहे. हे विधान वर वर विचार केला तर निराशावादाचे व पराभूत मनोवृत्तीचे वाटेल. पण सुखदुःखाची व्यावहारिक कल्पना व पारमार्थिक कल्पना समजावून घेतली तर हा गैरसमज राहणार नाही. ज्ञानदेवांनी सुखाची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे -

किंबहुना सोये । जीवा आत्मयाचि लाहे ।
तेथ जें होये । तया नाम सुख ॥ ज्ञाने. अ. १३॥

जीव आत्माकार झाल्यावर जे काही होते ते सुख. जीव जीवभावाने राहू लागला की जे काही होते ते दुःख. ह्या सुखदुःखाचा तपशील गौण आहे. देहतादात्म्य, जगत्-सत्यत्व, अहं-ममत्व, कर्तृत्व-भोक्तृत्व हे दुःख. या सर्वांचा बाध केलेले जीवन सुखरूप होय. अंतःकरणवृत्ती जर बाधित झाली असेल तर प्रारब्धवशात् अंगावर येणारी सुखदुःखे त्या अंतःकरणावर अनुकूल वा प्रतिकूल तरंग उमटवू शकत नाहीत. संत एकनाथ महाराज म्हणतात -
"एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश होय ॥"

प्रारब्धाचा नाश होत नाही. ते अनिवारपणे अंगावर येऊन आदळते.परंतु त्याचे जीवाला सुखदुःखाचे भोग देण्याचे सामर्थ्य संपते कारण मुक्त जीव ते भोग स्वीकारीत नाही. अंतःकरण बाधित करून जगत् मिथ्या असल्याचा अनुभव देणारी ही प्रक्रिया, श्रीगुरूंच्या मुखातून अधिकारी शिष्याच्या कानात पडलेल्या महावाक्याच्या निदिध्यासाने सिद्धीला जाते.

कवी लक्ष्मीधर यांनी महावाक्याला "कटाक्ष" असे वैशिष्ट्यपूर्ण विशेषण दिले आहे. श्रीस्वयंप्रकाशयतींनी त्याचा "शेवटचे प्रमाण" असा यथार्थ अर्थ केला आहे. प्रत्यक्ष, अनुमानादी सहा प्रमाणांमध्ये शब्दप्रमाण हे पारमार्थिक दृष्ट्या सर्वश्रेष्ठ - अंतिम - अखेरचे -प्रमाण आहे. त्यालाच आप्तवाक्य, वेदवाक्य, गुरूवाक्य, शास्त्रवाक्य इ. नावे आहेत.

श्रीज्ञानदेव म्हणतात -

विषयव्याळें मिठी । दिधलिया नुठी ताठी ।
ते तुझिये गुरूकृपादृष्टी । निर्विष होय ॥ ज्ञाने. अ १२-२ ॥

प्रत्येक ज्ञानेंद्रियाला त्या त्या विषयाची मिठी असते. उदा. डोळ्याने रुपाचे अनावरपणे ज्ञान होते. ते रूप सत्य वाटणे हेच त्यातील विष होय. श्रीगुरूंच्या कृपेची दृष्टी प्राप्त झाली असता विषयांतील सत्यत्वाचे विष नाहीसे होते. महावाक्य हे गुरूकृपेचे माध्यम असून त्यामध्ये जगत् मिथ्या आहे हे समजावून सांगून तसे अनुभवाला आणून देण्याचे सामर्थ्य आहे, हेच समुद्राचे आटणे होय. "तत् त्वम् असि" हे प्रसिद्ध महावाक्य हाच "कट-अक्ष" आहे.

श्रीज्ञानदेव म्हणतात -

मोटके गुरुमुखे उदैजत दिसें । आणि हृदयी स्वयंभचि असे । प्रत्यक्ष फावो लागे तैसे। आपैसया ॥ज्ञाने. ९.४९॥

केवळ प्रत्येकी दोन अक्षरे असलेले तीन शब्द (तत् त्वम् असि) श्रीगुरूंच्या मुखातून बाहेर पडताच हृदयात कूटस्थचैतन्यरुपाने अनादी, नित्य असलेले ब्रह्म अगदी सहजतेने अपरोक्षत्वाने अनुभवाला येऊ लागते. आत्मानुभूतीसाठी याहून दुसरे प्रमाण नाही. कटाक्षाचे अन्य अर्थ गौण आहेत.

***